# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,

## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

८५) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि२०.१२.२०२४

जिल्हा :धुळे

| मागील आठवड्यातील हवामान (१३/१२/२०२४ ते १९/१२/२०२४) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदा (२१/१२/२०२४ ते २५/१२/२०२४) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | दिनांक | २१ | २२ | २३ | २४ | २५ |
| | | | | | | | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| | | | | | | | कमाल तापमान(अंसे) | ३२ | ३२ | ३१ | ३२ | ३३ |
| | | | | | | | किमान तापमान(अंसे) | १३ | १२ | १२ | १३ | १३ |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | ० | ० | १ | १ | १ |
| | | | | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता(%) | ७० | ७१ | ७१ | ७० | ७१ |
| | | | | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता(%) | ४२ | ४३ | ४२ | ४२ | ४२ |
| | | | | | | | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | ०.५ | १.८ | ४.० | १.८ | ३.३ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | हवामान अंदाज आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा. |
| संदेश | | गहू: गहू पिकास उरलेले निम्मे नत्र पेरणीनंतर तीन आठवड्यांनी खुरपणी झाल्यावर पहिल्या पाण्याच्या वेळी द्यावे |
| करडई | वाढीची अवस्था | मागिल आठवड्यातील ढगाळ आणि आर्द्र हवामानामुळे , तसेच पुढे किमान तापमानात घट होण्याची शक्यता असल्याने करडई पिकावर मावा किडींचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता वाढते. कडेच्या ओळीवर मावा दिसल्यास ॲसिफेट ७५ एस. पी. १६ ग्रॅम प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात पहिलीफवारणी करावी. |
| रबी ज्वारी | पीक वाढीची अवस्था | मागिल आठवड्यात किमान तापमानात घट झाल्याने ज्वारी पिकावर मावा किडींचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता वाढते. ज्यामुळे चिकट रोगाचा प्रसार होत आहे.<br>चिकटा रोगाचा प्रादुर्भाव आढळून आल्यास ३० % टक्के प्रवाही डायमिथोएट ५०० मिली ५०० लिटर पाण्यातून फवारावे किंवा थायोमेथोक्झाम ०५ ग्रॅम + मॅन्कोझेब २.५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून आवश्यकतेनुसार फवारावे. |
| हरभरा | जिरायत हरभरा फुलोरा अवस्था | मागिल आठवड्यातील ढगाळ व आर्द्र हवामानामुळे पिकावर फुलकळी लागण्याच्या वेळेस बारीक आळया दिसून आल्यास व पानावरती पांढरे डाग दिसताच निंबोळी अर्काची फवारणी करावी.<br>हरभरा पिकात किडीच्या सर्वेक्षणासाठी हेक्टरी ५ कामगंध सापळे लावावेत. किडीच्या नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्काची पहिली फवारणी करावी. |
| गहू | उगवण ते रोप अवस्था | गहू पिकास पेरणीनंतर दोन पाणी देणे शक्यक असल्यास पहिले पाणी २० ते २२ दिवसांनी म्हणजेच मुकुटमुळे फुटण्याची अवस्थेत द्यावे . गहू पिकास उरलेले निम्मे नत्र पेरणीनंतर तीन आठवड्यांनी खुरपणी झाल्यावर पहिल्या पाण्याच्या वेळी द्यावे. |
| कांदा | वाढीची अवस्था | मागील आठवड्यातील ढगाळ आणि आर्द्र हवामानामुळे , तसेच पुढे किमान तापमानात घट होण्याची शक्यता असल्यामुळे कांदा पिकावर फूलकिडे किडींचा प्रादुर्भाव आणि करपा रोग होण्याची शक्यता वाढत आहे. जर कांदा पिकामध्ये करपा रोग आढळून आला , तर फूलकिडे व करपा रोग नियंत्रणासाठी स्वच्छ हवामानात १५ मि.लि. डिमेथोएट ३०% ईसी किंवा ६ मि.लि. लॅम्बडा-सायहॅलोथ्रिन ५% ईसी आणि १० मि.लि. टेबुकोनाझोल यांचे १० लिटर पाण्यातील द्रावण फवारावे. |
| टोमॅटो | | पिनवर्मचा प्रादुर्भाव झाल्यास, प्रति एकर १६ पिवळे चिकट सापळे शेतात लावावेत. जास्त प्रादुर्भाव झाल्यास क्लोरॅंट्रानिलीप्रोल १८.५ एससी @ ३ मिली किंवा फ्लुबेन्डियामाइड ४८० एससी @ ३ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| मिरची | | लीफ कर्ल विषाणूच्या व्यवस्थापनासाठी , झाडाचा प्रादुर्भाव झालेला भाग काढून टाकणे आणि हा विषाणू पसरविणाऱ्या पांढरी माशीचे नियंत्रण करण्यासाठी ॲसिटामिप्रिड २० एसपी @ ३ ग्रॅम प्रति १५ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| वांगी | | शेंडे व फळ पोखरणाऱ्या अळीचे नियंत्रण करण्यासाठी प्रति एकर ५ फेरोमोन सापळे वापरून नियमित निरीक्षण करावे. प्रादुर्भाव झालेले शेंडे आणि फळे गोळा करून जमिनीत खोलवर गाडावीत. जास्त प्रादुर्भाव असेल तर क्लोरपायरीफॉस २० ईसी @ २० मिली किंवा इमामेक्टिन बेंझोएट ५ एसजी @ ४ ग्रॅम किंवा थायोडीकार्ब ५० डब्ल्यूपी @ १५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| **भाजीपाला पिके** | | मागिल आठवड्यातील ढगाळ वातावरणामुळे रस शोषणार्याि किडीचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. रस शोषणार्याड किडीच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० ईसी १५ मिली किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ एसएल ४ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **पशुधन** | | तापमानात चढ उतार होत असल्याने विषाणूजन्य आजारांत वाढ होण्याची शक्यता असते. ऊस तोडणी हंगाम असल्याने जनावरांची वाहतूक मोठ्या प्रमाणात होत आहे , तरी लाळ्या खुरकूत आजाराचे लसिकरणाबाबत आग्रही रहावे. या कालावधीत फुप्पुस दाह होण्याची शक्यता जास्त असते त्यामुळे काळजी घेणे गरजेचे आहे |

**स्त्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान :

ठिकाण : मफुकृवि , राहुरी.

दि. : २०.१२.२०२४

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**

**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**